# कवितेचे गाणे होताना...

सहज youtube वर एक video बघितला, कवितेचे गाणे होताना... आणि मग मनात सहज विचार आला, खंरच कविता आणि गाणे किती मोठा मोठा फरक आहे. मराठी पद्यरचनेच्या प्रकारातील दोन गोष्टी. वरवर पाहता दोन्ही मध्ये साधर्म्य वाटावे पण खूप मोठा फरक आहे.

गाणं हे लोकप्रियतेच्या निकषांचा जणू एक भाग आहे. आपण म्हणतो ते गाणं किती लोकप्रिय किंवा hit झालं. लोकप्रियता ही जणू गाण्याच्या यशाचा मापदंड आहे जणू. गाणी ही काळानुरूप बदलतात, त्याची रुची काळानुरूप बदलते. त्या काळातील समाजाच्या अभिरुचीनुसार त्याची लोकप्रियता ठरते.

गाणं लोकप्रिय होण्यामध्ये संगीतकाराचा मोठा वाटा आहे किंबहुना गाण्याला खरी ओळख संगीतकारच देत असतो. त्याच्या संगीतातील वाद्यांचा मेळ, melody, ठेका ह्यामुळे त्या गीताला नवीन सौंदर्य बहाल होतं.

बऱ्याच वेळा चाल तयार असते त्या चालीवर आधारित शब्दरचना करत गीतकाराला गाणं लिहावं लागत. एखाद गाणं लोकप्रिय झाले की त्याची चाल जास्त स्मरणात राहते किंबहुना बराच श्रोतृवर्ग गाण्याच्या शब्दांकडे कमी लक्ष देतो. त्याचे खरे लक्ष चालीकडे आणि संगीतकारांनी रचलेल्या संगीताकडेच जास्त असते त्यामुळे अशावेळी तो गीतकार दुर्लक्षित राहण्याची शक्यता असते.

'मोगरा फुलला' हे भावगीत लतादीदीच्या सुरेख आवाजाने आणि पंडित हृदयनाथ मंगेशकरांच्या सुंदर रचनेने एवढे लोकप्रिय आहे, पण ही रचना संत ज्ञानेश्वरांची आहे, हे खूप कमी लोकांना माहीत असते. बऱ्याच वेळा संगीत इतकं लोकप्रिय असतं की काव्य.. Lyrics दुर्लक्षित राहते.

लावणी हा लोकसंगीतातील लोकप्रिय प्रकार. लावणीतील गायिका आणि संगीतकार ह्यांची नावे इतक्या सहजपणे लोकांना माहीत असतात, पण गीतकार म्हणून कोण विचारलं तर सांगता येणार नाही. जगदीश खेबुडकारांनी इतक्या लोकप्रिय लावण्या लिहिल्या आहेत पण खेबुडकरांपेक्षा संगीताकार आणि गायक जास्त परिचित झालेत.

लोकप्रियतेच्या आणि यशाच्या मापदंडावर आधारित गाणी खूप लोकप्रिय होतात आणि लोकांच्या ओठी त्या चाली सहज रुजतात. मग कुठल्याही गाण्याच्या कार्यक्रमात त्याची फर्माईश केली जाते आणि त्या गाण्यांना अधिकाधिक प्रसिद्धी मिळत जाते.

गाणे लोकप्रिय होण्यासाठी चित्रपट हे एक प्रभावी माध्यम होय. ही गाणी त्या चित्रपटातील आशयानुरूप समाविष्ट केली जातात आणि ती त्या प्रसंगात इतकी चपखल बसतात की जणू चित्रपटाचे कथानक पुढे नेण्यास हातभार लावतात. चित्रपटातील बहुतांशी गाणी लोकप्रिय होत असतात. त्या काळातील अभिनेता किंवा अभिनेत्रींच्या लोकप्रियतेनुसार त्या गाण्यांनाही लोकप्रियता प्राप्त होते. आता उदाहरण द्यायचे तर अमिताभ बच्चन ह्यांच्या काळातील त्यांच्या लोकप्रियतेच्या परमोच्च कालावधीत 'लावारीस' चित्रपटातील ' मेरे अंगने में' हे तसे काव्य म्हणून सुमार दर्जाचे गीत परंतु अभिनेता आणि संगीत ह्यांच्या बळावर ते गाणे लोकप्रिय झाले. त्यात फक्त त्या अभिनेत्याची लोकप्रियता कारणीभूत, अन्यथा त्या गाण्याच्या शब्दांना काय तो अर्थ?

हिंदी चित्रपट किंवा मराठी चित्रपट ह्यांतील गाणे हा अविभाज्य घटक आहे. त्या गाण्यांच्या लोकप्रियतेचा जेवढा फायदा त्या अभिनेता/ अभिनेत्री आणि संगीतकारास होत असेल तेवढा फायदा त्या गीतकारास होत नाही, किंबहुना गीतकार तसा दुर्लक्षित राहतो. त्यामुळे गाणी ही लोकांच्या अभिरुचीनुसार आणि समाजाच्या बदलत्या आवडीनुसार लिहिली  जातात. त्याचमुळे लोकसंगीताच्या नावाखाली 'नवीन पोपट हा' सारखी गाणी लिहिली जातात. ह्यात 'मागणी तसा पुरवठा' ह्या आर्थिक तत्वानुसार गाणी लिहिली गेली आणि त्यामुळे अभिरुची बदलत गेली.

ह्या गोष्टींना काही गीतकार अपवाद आहेतच, जसे ' गुलजार'. ह्या व्यक्तीने गीत लिहिताना स्वतःची शैली विकसित केली किंबहुना गुलजार ह्याची गाणी लोकप्रिय होताना संगीतकरांसोबत गीतकार गुलजार ह्याचा उल्लेख ठसठशीत असतो.

'आँधी' चित्रपटतील लोकप्रिय गाणी, आजही, आर. डी. बर्मन संगीतकार आणि गीतकार गुलजार यांची म्हणून प्रसिद्ध आहेत. गुलजार ह्यांच्या सहज शब्दांतील काव्याला आर. डी. बर्मन ह्यांनी पूरक संगीत दिले. त्यामुळे गुलाजारांच्या कवितेचे सहज गाणे झाले आणि ती त्या चित्रपाटात चपखल बसली. 'आँधी' चित्रपटातील प्रत्येक गाणे चित्रपटाचा आशय पुढे घेऊन जाते.

आता महत्वाचा मुद्दा कवितेचा. कविता ही कवीने स्वतःसाठी, स्वतःच्या आनंदासाठी केलेली निर्मिती आहे. कविता ही त्या कवीची खरी प्रतिभा आहे, त्या कवीची खरी ओळख आहे. तो खरा त्याचा आनंद आहे. ती कविता लिहिताना, ते काव्य जणू स्फुरते. त्या कवीची अगाध प्रतिभा उफाळून आली की हे काव्य जन्माला येते. ती कविता, ते काव्य निर्माण होण्यास काळाचे बंधन नाही. एखादी कविता अशी अचानक स्फुरते की चुटकीसरशी कागदावर अवतरते. ते काव्य निर्माण होतात कवीची प्रतिभा अत्युत्तम पातळीवर असावी लागते. महाराष्ट्राचे आधुनिक वाल्मिकी ग. दि. माडगूळकर ह्यांनी

लिहिलेले 'गीतरामायण' त्यांच्या उत्तम प्रतिभेची निर्मिती होय. गीतरामायण मधील सर्व गाणी इतकी सरल आहेत की ती रामायणाच्या पात्रांतील एकमेकांशी संवाद साधतात जणू.. अशी ही अद्भुत काव्यनिर्मिती होय. त्या महान काव्यास कालानुरूप बाबूजींनी, तितक्याच श्रवणीय चाली लावून 'गीत रामायण' अजयामर केले.

कविता ही कवीचे लाडके अपत्य होय. त्याला संगीताकार छानपणे सजवून आकर्षक करतो.

महान कवी सुरेश भट तसे चमत्कारिक व्यक्तिमत्व. ह्या अवलियाने त्याच्या कवितेचा बाजार होऊ दिला नाही. मात्र सुरेश भटांच्या कवितेला खरा न्याय दिला असेल तर पंडित हृदयनाथ मंगेशकरांनी. पंडितजींची संगीत रचना त्या महान गीतकराच्या काव्याशी पूरक आहेत. पंडितजींनी ह्या कवितेला चाली लावण्याआधी त्या काव्याचा सखोल अभ्यास केला आहे आणि त्यानुसार त्या कवितेला समर्पक चाली लावत ती काव्यरचना लोकप्रिय केली आहे. त्यामुळे 'सुन्या सुन्या मैफिलीत माझ्या' ही मराठी गझल लोकप्रिय गीत बनले आणि 'उंबराठा' चित्रपटात चपखलपणे बसले.

वयाच्या सतराव्या वर्षी पंडित हृदयनाथ यांनी भा. रा. तांबे ह्या महान कवीचे काव्य 'तिन्ही सांजा सखे मिळाल्या' संगीतबध्द केले. ती चाल आणि ते शब्द आजही इतके ताजेतवाने वाटतात. आज किती पिढ्यांनी त्या काव्याचा आणि संगीताचा आनंद घेतला असेल. त्यामध्ये भा. रा. तांबेंच्या महान काव्याइतकाच संगीताकाराचा मोलाचा वाटा आहे. त्यामुळे त्या कवितेचे गाणे झाले.

पंडितजींनी ज्या महान कवींची काव्यं लोकप्रिय केली, त्यांत संत ज्ञानेश्वर ह्यांची काव्यरचना. ज्ञानेश्वरांच्या प्राचीन काव्याला त्या अनुरूप संगीत देत त्या मूळ काव्याचे सौंदर्य अबाधित ठेवत सर्वोत्तम संगीत दिले आहे.

कवितेच्या बाबत सुधीर मोघेंचे काव्य असेच समर्पक संगीतामुळे लोकप्रिय झाले. 'एकाच या जन्मी जणू' असे प्रेरणादायी काव्य बाबूजींच्या संगीतामुळे लोकप्रिय झाले आणि त्या कवितेचे गाणे झाले आणि 'पुढचे पाऊल' ह्या चित्रपटात चपखलपणे बसले.

सुरेश भट ह्यांची 'उष:काल होता होता' ही अजरामर काव्यनिर्मिती पंडित हृदयनाथ मंगेशकरांच्या चालीमुळे लोकप्रिय झाली. त्या कवितेचे गाणे होत 'सिंहासन' चित्रपटातील लोकप्रिय गीत झाले.

कवी ग्रेस असेच प्रतिभावान कवी. त्यांच्या कविता प्रथमदर्शनी सहजपणे आकलन न होणाऱ्या... परंतु पंडित हृदयनाथ मंगेशकरांनी त्या कवितेचा सखोल अभ्यास करून त्या काव्यास अनुरूप चाली लावत

ती काव्यं अजरामर केली.

'भय इथले संपत नाही' ह्या काव्यास यमन रागात बांधत ती चाल इतकी सुंदर बनवली की ते काव्य अजरामर झाले. प्रथमतः दूरदर्शनवरील एका मराठी मालिकेचे ते शीर्षक गीत होते. त्यानंतर कालानुरूप लतादिदींच्या सुरेल आवाजात ते काव्य, कविता कधी गीतात परिवर्तित झाले कळालेही नाही. कवी ग्रेस ह्यांच्या इतर कविता, जसे 'ती गेली तेव्हा रिमझिम'   किंवा 'घर थकलेले संन्यासी', 'वाऱ्याने हलते रान' अश्या कविता, संगीतबध्द करत पंडित हृदयनाथ मंगेशकरांनी त्याचे गाण्यात रूपांतर केले. पुढे तीच गाणी 'निवडुंग' चित्रपटात समाविष्ट केली. ’निवडुंग’ चित्रपट चालला नाही, मात्र ही गाणी तितकीच लोकप्रिय झाली आणि आजही टवटवीत आहेत. त्यात कवी ग्रेस ह्यांच्या सर्वोत्तम काव्यनिर्मिती सोबत पंडितजींचा मोलाचा वाटा आहे. त्यांच्यामुळेच ह्या कवितेचे गाणे झाले.

ह्या सगळ्या बाबींचा विचार करता कविता ही कवींची निर्मिती आहे, कवीने स्वतःच्या आनंदासाठी केलेली निर्मिती आहे. ते काव्य लिहिताना त्या कवींच्या प्रतिभेला आलेल्या भरतीमुळे ते काव्य निर्माण झाले.

स्वातंत्रवीर सावरकर हे अंदमान येथील कारागृहात असतात बंदिवान अवस्थेत साखळदंडानी बांधले असतानाही, कोळशाच्या साह्याने कारागृहाच्या भिंतीवर स्वातंत्र्यवीरानी अजरामर काव्य लिहिले. ब्रायटनच्या समुद्रकिनाऱ्यावर 'ने मजसी ने, परत मातृभूमीला' ह्या अजरामर काव्याची निर्मिती केली. स्वातंत्रवीर सावरकर महान क्रांतिकारी आणि देशभक्त आहेत, पण ते महान कवी होते. त्यांचे काव्य उच्च दर्जाचे आहे.

स्वातंत्रवीर सावरकरांच्या काव्यप्रतिभेला खरा न्याय पंडित हृदयनाथ मंगेशकरांनी दिला. पंडिजीनी ते काव्य अनुभवले आणि त्यामुळेच इतकी सुंदर रचना करत ती कविता गीतात परिवर्तित केली.

कवितेचे गाणे होत असताना, संगीतकार ते काव्य इतक्या समरसतेने अनुभवत असतो की त्या काव्याच्या गूढ अर्थापर्यंत पोहोचत असतो आणि कवीला अभिप्रेत असलेला गर्भितार्थ त्या संगीतकारापर्यंत पोचल्यामुळेच त्या सुंदर कवितेचे गाणे होताना दिसते आणि त्या गाण्यात रूपांतरित झाल्यावर त्या कवितेला खरी लोकप्रियता आणि राजाश्रय मिळतो.

**- मनोज मोहन कुरुंभटी**